# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः 20.05.2022** **वारः शुक्रवार**

---

**ठळक बातम्या**

जागतिक अन्नसुरक्षेला आधार देण्यासाठी भारत आपली योग्य भूमिका बजावेल, केंद्राची जागतिक समुदायाला हमी

यंदाच्या खरीप हंगामासाठी सुमारे 18 लाख क्विंटल बियाणं आवश्यक

वाशीम जिल्ह्यातील ढोरखेडा ग्राम पंचायतीद्वारे विधवा भेदभाव विरोधी ठराव मंजूर

पुणे जिल्ह्यात दोन धरणांमध्ये बुडून 9 जणांचा मृत्यू आणि

राष्ट्रीय रोल बॉल स्पर्धेला पुण्यामध्ये आरंभ

**भारत अन्न**

भारतानं जागतिक अन्न असुरक्षिततेबद्दल चिंता व्यक्त केली असून या असुरक्षिततेची सर्वाधिक झळ बसलेल्या लोकांचं दुःख कमी करण्यासाठी सामूहिक कामाची गरज अधोरेखित केली आहे. न्यूयॉर्कमध्ये “जागतिक अन्न सुरक्षितता-कृतीसाठी आवाहन” या विषयावरील उच्चस्तरीय मंत्रिस्तरीय बैठकीला संबोधित करताना परराष्ट्र राज्यमंत्री व्ही मुरलीधरन म्हणाले की कोविड-19 महामारी आणि रशिया-युक्रेन दरम्यान सुरू असलेल्या संघर्षाचा परिणाम विकसनशील देशांवर झाला आहे. ऊर्जा आणि जीवनावश्यक वस्तूंच्या किंमतीमध्ये वाढ होत आहे आणि जागतिक लॉजिस्टिक पुरवठा साखळीत व्यत्यय येत आहे. मुरलीधरन यांनी अन्न संकटावरील जागतिक अहवालाकडे लक्ष वेधताना सांगितलं की 2022 च्या अहवालानुसार, जगभरात 139 दशलक्ष लोकांना संघर्ष-प्रेरित तीव्र अन्न असुरक्षिततेचा सामना करावा लागला आहे. जागतिक अन्नसुरक्षेला आधार देण्यासाठी भारत आपली योग्य भूमिका बजावेल, यामध्ये भारत समानतेसाठी समर्थन करेल, आणि सामाजिक न्यायाला प्रोत्साहन देईल. अफगाणिस्तानातील बिघडत चाललेली मानवतावादी परिस्थिती लक्षात घेता, भारत तिथल्या लोकांना 50,हजार मेट्रिक टन गहू दान करत आहे. भारताने म्यानमासाठी 10 हजार टन तांदूळ आणि गहू अनुदानासह मानवतावादी मदत सुरू ठेवली आहे. या कठीण काळात भारत श्रीलंकेला अन्न पुरवठा करत आहे.

**ठाकूर**

भारतामध्ये जगाला सामग्री पुरवणारा उपखंड बनण्याची क्षमता आहे आणि चित्रपटांच्या निर्मिती-प्रश्चात कामांसाठी भारत पसंतीचं ठिकाण असल्याचं केंद्रीय माहिती आणि प्रसारण मंत्री अनुराग ठाकूर यांनी म्हटलं आहे. फ्रान्समध्ये कान्स इथं इंडिया फोरम ऑन इंडिया-द कंटेंट हब ऑफ द वर्ल्ड या विषयावरील चर्चेदरम्यान बोलताना ठाकूर म्हणाले की सरकारी धोरणांचं उद्दिष्ट भारतातील माध्यमं आणि मनोरंजन परिसंस्थेला चालना देण्याचं आहे, यातून वार्षिक 53 बिलियन डॉलर्सची निर्मिती अपेक्षित आहे. भारतीय चित्रपट केवळ भारतीयांचेच नाही तर जगभरातील प्रेक्षकांचंही मनोरंजन करत आहेत. देशात सह-निर्मिती आणि चित्रीकरणाला चालना देण्यासाठी सरकारनं गेल्या आठ वर्षांत अनेक उपक्रम हाती घेतले असल्याचं ठाकूर यांनी नमूद केलं.

दरम्यान कान्स चित्रपट महोत्सवात सहभागी होण्यासाठी सांस्कृतिक कार्य मंत्री अमित देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्राचं शिष्टमंडळ काल रवाना झालं. या शिष्टमंडळात सांस्कृतिक कार्य विभागाच्या अधिकाऱ्यांसह 'कारखानीसांची वारी ', ' पेटारा ' आणि ' तिचं शहर होणं ' या मराठी चित्रपटांचे निर्माते, दिग्दर्शक अर्चना बोरहाडे, मंगेश जोशी, शंकर धोत्रे, समीर थोरात, सिध्दार्थ मिश्रा, रसिका आगाशे याही सहभागी झाल्या आहेत.

**आकाशवाणीच्या बातम्या - ट्विटर**

इंट्रो-

आकाशवाणीच्या बातम्यांनी सोशल मीडियावर आणखी एक मैलाचा टप्पा गाठला आहे. ऍट एआयआरन्यूज ऍलर्ट्स या ट्विटर हँडलचे आता 30 लाखांहून अधिक फॉलोअर्स झाले आहेत. याविषयी अधिक माहिती देणारा हा वृत्तांत...

**स्क्रिप्ट-**

सायबरविश्वामध्ये आकाशवाणीच्या बातम्यांची लोकप्रियताच या टप्प्यावरुन दिसून येते.बातम्यांसाठी श्रोते आकाशवाणीच्या विविध बातमीपत्रांवरच विश्वास ठेवतात, त्याचं हेप्रतीक आहे. या बातम्यांमधील सत्यता, अचूकता आणि निष्पक्षपणा या गुणधर्मांवरसर्वसामान्य श्रोत्यांसोबत आता ट्विटरवरील सजग श्रोत्यांनी देखील पसंतीची मोहोरउमटवली आहे. विशेष म्हणजे या श्रोत्यांमध्ये युवा वर्गाचं प्रमाण सर्वाधिक आहे. आकाशवाणीच्याबातम्यांवर लोकांनी पुन्हा व्यक्त केलेल्या विश्वासाबद्दल वृत्त सेवा प्रभागाचेप्रधान महासंचालक एन वी रेड्डी यांनी श्रोत्यांचे आभार मानले आहेत. बातम्यांशीसंबंधित सर्वांचे सांघिक प्रयत्न आणि आकाशवाणीच्या बातम्यांची विश्वासार्हता यांचाहा निष्कर्ष असल्याचं त्यांनी म्हटलं आहे. आकाशवाणीचा वृत्त सेवा प्रभाग 77 भारतीयभाषा आणि बोलीभाषांमध्ये तसंच 12 परदेशी भाषांमध्ये बातम्या प्रसारित करत असतो.1936 मध्ये स्थापित आकाशवाणी हे जगातील सर्वात मोठं रेडियो जाळं आहे. बदलत्याकाळानुसार आकाशवाणीच्या बातम्यांनी आता सायबर विश्वातही स्थान जमवलं असून अधिकाधिकश्रोत्यांपर्यंत पोहोचण्यासाठी मोठ्या प्रमाणात समाज माध्यमांचा अंगिकार केला आहे.आकाशवाणीच्या बातम्यांसाठी, मनोज क्षीरसागर, पुणे.

**राजनाथ सिंह**

केंद्रीय संरक्षण मंत्री राजनाथ सिंह आज पुणे दौऱ्यावर येणार आहेत. डी वाय विद्यापीठाच्या पदवीदान समारंभाला ते आज दुपारी उपस्थित राहणार आहेत.

**लष्कर**

लष्कराच्या दक्षिण विभागाच्या कार्यालयात क्षिप्रा या शैक्षणिक ध्वनिचित्रफितीचं प्रकाशन रक्षा प्रधान नियंत्रक सतीश पेंढारकर आणि रक्षा लेखा महासंचालक रजनीश कुमार यांच्या हस्ते काल झालं. क्षिप्रा ही रक्षा लेखा प्रधान नियंत्रक कार्यालयाने बनवलेली शैक्षणिक ध्वनी चित्र फितींची एक मालिका आहे, या माध्यमातून सेनेच्या जवानांना त्यांच्या भर्तीपासून सेवानिवृत्तीपर्यंत, त्यांना देय असलेल्या पगार आणि भत्त्यांसंबंधी विस्तृत माहिती देण्यात आली आहे. स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवाअंतर्गत ,स्वातंत्र्य संग्रामातल्या 25 विरांगनांना समर्पित असलेल्या वीरांगना दालनाचं उद्घाटन रजनीश कुमार यांच्या पत्नी रत्ना कुमार यांच्या हस्ते झालं.

**खरीप बैठक**

पूर्व तयारी समाधानकारक झाल्यामुळे यंदाचा खरीप हंगाम यशस्वी होईल, असा विश्वास मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी काल व्यक्त केला. मुंबईत आयोजित खरीप हंगामपूर्व आढावा बैठकीत ते बोलत होते. आरोग्यासाठी पोषक गुणधर्म असणारी बियाणं शेतकरी बांधवाना मोफत देणारं आणि शेतकऱ्यांचा आरोग्याचा विचार करणारं महाराष्ट्र हे देशातील पहिलं राज्य ठरलं आहे. विकेल ते पिकेल अभियान यशस्वी करण्यासाठी शेतकरी बांधवांना मार्गदर्शन करा, शेतीला आधुनिकतेची जोड द्या असं आवाहन मुख्यमंत्र्यांनी यावेळी केलं.

यंदाच्या खरीप हंगामासाठी सुमारे 18 लाख क्विंटल बियाणं आवश्यक असून महाबीज, राष्ट्रीय बियाणे महामंडळ आणि खासगी संस्थांकडे मिळून सुमारे 20 लाख क्विंटल बियाणं अपेक्षित आहे अशी माहिती कृषी मंत्री दादा भुसे यांनी बैठकीत दिली. या खरीप हंगामासाठी एप्रिल ते सप्टेंबर या कालावधीत 45 लाख मेट्रीक टनांहून अधिक रासायनिक खतं उपलब्ध होणार असून त्यापैकी सुमारे 9 लाख मेट्रीक टन खतांचा पुरवठा झाला आहे. सध्या राज्यात सुमारे 17 लाख मेट्रीक टन रासायनिक खतांचा साठा उपलब्ध असल्याचही त्यांनी स्पष्ट केलं.

**कोल्हापूर कृषी प्रदर्शन**

राजर्षी शाहू महाराजांनी राबवलेल्या कृषी विषयक निर्णयांची अंमलबजावणी करून त्यांना मानवंदना देण्यासाठी कोल्हापूर जिल्ह्यातल्या श्री शाहू छत्रपती मिलमध्ये आजपासून कृषी प्रदर्शनाचं आयोजन केलं आहे. येत्या 22 तारखेपर्यंत सुरू राहणाऱ्या या कृषी प्रदर्शनात पश्चिम महाराष्ट्रातल्या शेतकऱ्यांनी सहभागी व्हावं, असं आवाहन जिल्हाधिकारी राहुल रेखावार यांनी केलं आहे. विषमुक्त शेती, शेतमालावर कमीतकमी किटकनाशकांचा वापर आणि सेंद्रीय शेतीला चालना देणं हा या प्रदर्शनाचा एक प्रमुख उद्देश आहे.या कृषी प्रदर्शनात 300 हून अधिक शेतकऱ्यांची तसंच कृषी विषयक साहित्यांची दालनं , मार्गदर्शक तज्ञांचे परिसंवाद होणार आहेत.

**विधवा भेदभाव**

कोल्हापूर जिल्ह्यातील हेरवाड ग्रामपंचायतीनं विधवा भेदभाव प्रथा बंद करण्याचा निर्णय घेतल्यानंतर त्यापासून प्रेरणा घेऊन वाशीम जिल्ह्यातील ढोरखेडा ग्रामपंचायतीनेही असाच ठराव घेऊन विधवांना सन्मानाने जगण्याचा मार्ग खुला केला आहे. असा ऐतिहासिक निर्णय घेणारी विदर्भातील ही पहिली ग्राम पंचायत ठरली आहे. याबाबत आकाशवाणीशी बोलताना या ठरावाच्या सूचक, सरपंच सुनीता मिटकरी....म्हणाल्या

या गावात मी सभा आयोजित केली आहे या गावच्या विधवा महिलांसाठी सन्मान मिळवून दिला आहे आणि हा आमचा ठराव मंजूर झाला आहे या गावात लग्न , मुंज अशा मंगळ कार्यालयात सहभागी होता यावं आणि त्यांना मानसन्मानाने जगता याव म्हणून आम्ही हा ठराव मंजूर केला आहे

या ठरावाच्या अनुमोदक आशा सावळे यांनी सांगितलं....

आज आमच्या या ठिकाणी मंगळ कार्यालयात त्यांना सहभागी होता येईल या साठी मिटिंग आम्ही आयोजित केली या मध्ये आमच्या गावाचे जे सरपंच आहेत सुनिता मिटकरी यांनी या सभे मध्ये असा आदेश दिला या पुढे विधवा महिलांना कोणत्याही मंगळ कार्यालयात सहभागी होता येणार आहे. आणि त्यांना मानसन्मान देण्यात येईल .

**कांदा भाव**

नाशिक जिल्ह्यातील बाजार समित्यांमध्ये कांद्याचे भाव दिवसेंदिवस घसरत असून एक हजार रुपयांच्या खाली आले आहेत. त्याविरोधात देवळा कृषी उत्पन्न बाजार समितीच्या समोर कांदा उत्पादक शेतकऱ्यांनी तसंच विविध संघटनांनी काल रस्ता रोको आंदोलन केलं. कांद्याला प्रति क्विंटल 500 रुपये अनुदान मिळावं तसंच नाफेडनं कांदा खरेदी केल्यास किमान दोन हजार रुपये भाव मिळावा अशा मागण्या यावेळी करण्यात आल्या.

मुख्यमंत्र्यांना पत्र

सोलापूर - तुळजापूर - उस्मानाबाद या रेल्वे मार्गासाठी राज्य सरकारनं सम प्रमाणातील हिश्शाची रक्कम जमा करून भूसंपादन प्रक्रिया जलद गतीनं करण्याची विनंती केंद्रीय रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांना पत्राद्वारे केली आहे.आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी केंद्रीय रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांची दिल्लीत भेट घेवून सोलापूर - तुळजापूर - उस्मानाबाद या रेल्वे मार्गाचं महत्व विषद करत हा रेल्वे मार्ग राज्याकडून निधीची तरतूद होत नसल्यानं रेंगाळत असल्याचं निदर्शनास आणून दिलं होतं.विधानसभेचे विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांनी देखील याबाबत रेल्वे मंत्र्यांना पत्र देऊन  या प्रकल्पासाठी अतिरिक्त निधी देऊन प्रकल्पाच्या कामाला गती देण्याची विनंती केली होती. त्या अनुषंगानं रेल्वे मंत्री वैष्णव यांनी मुख्यमंत्र्यांना पत्र दिलं आहे.

मानव विकास

मानव विकास कार्यक्रमाच्या अंतर्गत मानव विकास आयुक्तालयाच्या माध्यमातून प्रत्येक जिल्ह्यात विविध योजना राबवण्यात येतात. या योजनांमध्ये मुलींची शिक्षणातील टक्केवारी वाढविण्यासाठी आणि त्यांचा शैक्षणिक विकास करण्याकरिता सायकल वाटप योजनेवर भर देण्याचे निर्देश मानव

विकास आयुक्त नितीन पाटील यांनी दिले.भंडारा जिल्ह्याच्या दोन दिवसीय दौऱ्यावर आलेल्या पाटील यांनी मानव विकास योजनेच्या अंमलबजावणीसाठी कार्यरत असणाऱ्या यंत्रणांना प्रत्यक्ष भेट देऊन पाहणी केली. तसंच जिल्हाधिकारी कार्यालयात वरिष्ठ अधिकाऱ्यांची बैठक घेतली.

सिंहगड

पुण्याजवळील सिंहगड किल्ला प्रमुख पर्यटन स्थळ म्हणून विकसित केलं जाणार आहे. स्थानिक नागरिकांना या प्रकल्पाच्या विविध कामात सामावून घेण्याची तयारी वन विभागानं दाखवली आहे. गडावरील घाटमार्गावर काही दिवसांपूर्वी इ बस सेवा सुरु झाली. मात्र स्थानिक तरुणांनी गडावर आणि गडाखाली गाडीतळाच्या माध्यमातून त्यांना मिळणारं उत्पन्नाचं साधन बंद झाल्याचं कारण देऊन त्याविरोधात आंदोलन सुरु केलं होतं. सध्या ही बससेवा तात्पुरती स्थगित करण्यात आली असली तरी भविष्यात पुन्हा सुरु होणार असल्यानं स्थानिक तरुणांना दुसऱ्या कामात सहभागी करून घेण्याचा प्रस्ताव वन विभागानं मांडला आहे.

धरणात मृत्यू

पुणे जिल्ह्यात दोन वेगवेगळ्या घटनांमध्ये नऊ जणांचा पाण्यात बुडून मृत्यू झाला आहे. यात चार विद्यार्थ्यांचा, तर पाच युवतींचा समावेश आहे. पुण्याच्या चासकमान आणि भाटघर धरणात या दोन्ही घटना घडल्या आहेत. शाळेला सुटी लागल्याने चासकमान धरणाजवळ गेलेले विद्यार्थी पाण्यात उतरले असताना त्यातील चौघांचा बुडून मृत्यू झालं. तर भाटघर धरणात पाच युवतींचा काल बुडून मृत्यू झाला.

कुस्ती

कझागीस्तानमध्ये जून महिन्यात होणाऱ्या आशियाई कुस्ती अजिंक्यपद स्पर्धेसाठी पुण्याच्या प्रतिक शंकर देशमुख याची भारतीय संघात निवड झाली आहे. हरियाणा इथं नुकत्याच पार पडलेल्या खुल्या गटाच्या निवड चाचणीमध्ये त्यानं हरियाणाच्या विजय कुमार वर मात करत यश संपादित केलं.

रोलबॉल

भारतीय रोलबॉल संघटना आणि राज्य रोलबॉल संघटना यांच्या वतीने राष्ट्रीय रोल बॉल स्पर्धा पुण्यातील म्हाळुंगे बालेवाडी क्रीडा संकुलात कालपासून आयोजित करण्यात आली आहे. मुलांच्या गटात काल महाराष्ट्र संघानं हरियाणा संघाला 11-4 असं पराभूत करत विजयी सलामी दिली. आदित्य गणेशवाडे यांने 5 गोल, अरिंजय कळकेरी आणि संजोग तापकीर यांनी प्रत्येकी 2 गोल केले. मुलींच्या गटात महाराष्ट्राने मध्य प्रदेश संघाचं आव्हान 6-1 असं सहज परतवून लावलं.श्रुती भगतने  सर्वाधिक 3 गोल करत विजय साकार केला.

हवामान

कोकण, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात काही ठिकाणी आज दिवसभरात मेघगर्जनेसह विजांच्या कडकटाडात पाऊस पडेल.विदर्भात काही भागांत तर दक्षिण कोकणात किनारपट्टीवर सोसाट्याचा वाराही वाहण्याची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे.

आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.